बी.एन.एस.एस.च्या अधिनियम दोन प्रकरण एकवीस संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख

प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, कळे खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे कार्यालय.

| | | |
|---|---|---|
| CNR No.MHKO200000262026 | | संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.१२/२०२६<br>नि.क्रं.३ |
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | ०६.१२.२०२५. |
| २. | अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक | ०६.१२.२०२५. |
| ३. | फिर्यादादाराचे संपूण नाव व पत्ता | महाराष्ट्र सरकारतर्फे<br>कळे पोलीस ठाणे, ता. पन्हाळा,<br>जि. कोल्हापूर. |
| ४. | आरोपीचे संपूर्ण नांव वय व पत्ता | **बबन बापु वाळवेकर**, व.व.४८,<br>रा. तळेवाडी, ता.पन्हाळा , जि. कोल्हापूर. |

५. ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगणेत आला त्या अपराधाचा तपशिल -

दिनांक ०६.१२.२०२५ रोजी १७.३० वाजणेचे सुमारास कळे ते गगनबावडा जाणारे रोडवर, शेतकरी हॉटेल समोर, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील हिरो होंडा एस.एस.क्र.एम.एच.-०९-३९३८ हे वाहन रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करुन मानवी जिवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचेल किंवा तसा संभव असेल अशा पध्दतीने इतक्या बेदरकारपणे व हयगयीने भरधाव वेगात धोकादायकरित्या सार्वजनिक रस्त्यावरुन चालवीत असताना मिळुन आला व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम २८१ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

**६. आरोपीचे प्रतिकथन -**

प्रश्न १ – तुम्हांला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर - होय

प्रश्न २ – तुम्हाला आता तुमचेवरचा दोषारोप मराठीतून समजावून सांगितला तो समजला काय ?

उत्तर - होय

प्रश्न ३ – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर - होय

समोर,

14/3/26

आरोपीची सही.

दिनांक - १४.०३.२०२६

कळे-खेरीवडे.

(व्ही.ए.लावंड-कोकाटे)
पॅनेल प्रमुख राष्ट्रीय लोकअदालत
तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे-खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

**- <u>न्यायनिर्णय</u> -**

**(दि.१४/०३/२०२६ रोजी घोषीत)**

आरोपी यांनी स्वतःहून भारतीय न्याय संहिता कलम २८१ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचे कबूल केले आहे.

आरोपीचे म्हणणे ऐकले. त्याची आर्थिक परिस्थिती गरिबीची असून त्याला कमीत कमी शिक्षा व्हावी अशी विनंती केली आहे. गुन्हयाचे स्वरुप तसेच आरोपीचे कबूलीचे कथन याचा विचार करता आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल. याकरीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. आरोपी **बबन बापु वाळवेकर**, रा. तळेवाडी, ता. पन्हाळा जि. कोल्हापूर यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये **भारतीय न्याय संहिता कलम २८१** अन्वये शिक्षापात्र गुन्हयासाठी दोषी ठरविणेत येत असून आरोपी याने या गुन्हयासाठी रक्कम रुपये **१०००/-(एक हजार फक्त)** मात्र द्रव्यदंड भरावा. दंड न भरलेस आरोपीस ३ (तीन) दिवसांची साधी कैद सुनावणेत येत आहे.

14/3/26

(व्ही.ए.लावंड-कोकाटे)
पॅनेल प्रमुख राष्ट्रीय लोकअदालत
तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
कळे-खेरीवडे, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर

दिनांक - १४.०३.२०२६.

कळे-खेरीवडे

Fine Paid of Rs. 1000/-
(Rs. One Thousand only) on
Jr. Clerk I/c Asstt. Supdt.